POSTAL REGISTRATION : PLG/255/2023-2025

RNI NO:- MAHMAR/2021/81614

मराठी दैनिक

# मराठी एकीकरण बातमीपत्र

मराठी मायबोलीचा अभिमान जोपासणारे एकमेव पत्र

○संपादक : डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक

○उप संपादिका : .सौ. प्रीती दिपक नाईक ○कार्यकरी संपादक : श्री. विनोद दशरथ मेढे

● वर्ष -०४ ● अंक-३०५ ● मुंबई, शुक्रवार, ०६ जून २०२५ ● पृष्ठ-८ ● मूल्य-५ रु.

MARATHI EKIKARAN BATMIPATRA



## देशभरात पुन्हा कोरोनाचे थैमान
### २४ तासांत ७ मृत्यू, महाराष्ट्राची स्थिती काय?

**कोणत्या राज्यात किती रुग्ण?**

| राज्य | रुग्णसंख्या |
|---|---|
| आंध्र प्रदेश | ५० |
| आसाम | ८ |
| बिहार | ३१ |
| चंदीगड | २ |
| छत्तीसगड | १९ |
| दिल्ली | ५६२ |
| गोवा | ८ |
| गुजरात | ५०८ |
| हरियाणा | ६३ |
| हिमाचल प्रदेश | ९ |
| जम्मू–कश्मीर | ५ |
| झारखंड | ८ |
| कर्नाटक | ४३६ |
| केरळ | १४८७ |
| उत्तर प्रदेश | १९८ |
| पश्चिम बंगाल | ५३८ |

**■मुंबई । प्रतिनिधी :**

देशभरात पुन्हा एकदा कोरोनाचा हाहाकार पाहायला मिळत आहे. सध्या कोरोनाच्या सक्रीय रुग्णसंख्येत वाढ होताना दिसत आहे. बुधवारी देशभरात ४ हजार ३०२ सक्रिय रुग्ण होते. आता आज ही संख्या वाढून ४ हजार ८६६ वर पोहोचली आहे. तसेच गेल्या २४ तासात ७ जणांचा मृत्यू झाला आहे. कोरोनाच्या रुग्णसंख्येत वाढ होत असली तरी दिलासादायक बाब म्हणजे अनेक रुग्ण या आजारातून बरे होत आहे. सध्या देशभरात बरे होऊन घरी परतलेल्या रुग्णांची संख्या ३,९५५ झाली आहे.

राजधानी दिल्लीत गेल्या २४ तासांत कोरोनाचे १०५ नवीन रुग्ण आढळले आहेत. ज्यामुळे सक्रिय रुग्णांची एकूण संख्या ५६२ इतकी झाली आहे. कोरोनामुळे दिल्लीत दोन मृत्यूंची नोंद झाली आहे. यात एका ५ महिन्यांच्या बाळाचा समावेश आहे. तर एका ८७ वर्षीय वृद्धाचा कोरोनामुळे मृत्यू झाला. संपूर्ण देशभरात २४ तासांत कोरोनामुळे ७ रुग्णांचा मृत्यू झाला आहे. यामध्ये दिल्लीतील २, कर्नाटकातील २ आणि महाराष्ट्रातील ३ रुग्णांचा समावेश आहे.

**महाराष्ट्रात तीन मृत्यू**

कोरोनाच्या रुग्णसंख्येत वाढता प्रादुर्भाव देशभरात दिसून येत आहे. कर्नाटकात २ कोरोना मृत्यूंची नोंद करण्यात आली आहे. यात एक ६५ वर्षीय आणि एका ४२ वर्षीय अशा दोन पुरुषांचा मृत्यू झाला आहे. महाराष्ट्रातही कोरोनामुळे तीन मृत्यूंची नोंद झाली आहे. यात २ पुरुष आणि एका वृद्ध महिलेचा समावेश आहे.

**नागरिकांना खबरदारीचे आवाहन**

देशात कोरोनाच्या पुनरागमनानंतर, प्रशासनाकडून नागरिकांना खबरदारी घेण्याचे आवाहन करण्यात येत आहे. पुन्हा एकदा सर्वांना मास्क लावणे आणि सुरक्षित सामाजिक अंतर राखण्याच्या सूचना दिल्या जात आहेत. तसेच, कोविडमुळे देशात निर्माण झालेल्या पूर्वीच्या परिस्थिती लक्षात घेता रुग्णालयांमध्ये तयारीला वेग देण्यात आला आहे. आवश्यक वैद्यकीय साधनांचा आणि वस्तूंचा पुरवठा सुनिश्चित केला जात आहे.




## पुन्हा पावसाचा जोर वाढणार
### अतिवृष्टी होणार... नदी नाले वाहणार

**■मुंबई । प्रतिनिधी :**

हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार, कालपासून म्हणजे ४ जूनपासून पाऊस पुन्हा सक्रिय झाला आहे. सध्या काही भागात पाऊस पडत आहे, तर काही भागात पावसानं उगडीप दिली आहे. गेल्या काही दिवसात मोठ्या प्रमाणात पाऊस झाला आहे. नदी नाले दुथडी भरुन वाहत आहेत.



धरणांच्या पाणीसाठ्यात वाढ होत आहे. दरम्यान, अशातच राज्यातील २६ जिल्ह्यांना यलो अलर्ट जारी करण्यात आल्याची माहिती हवामान अभ्यासक पंजाबराव डख यांनी दिली आहे. आज वादळी वारे, विजा आणि मध्यम पर्जन्याची शक्यता आहे.

गेल्या काही दिवसापासून राज्याच्या विविध भागात जोरदार पाऊस कोसळताना दिसत आहे. काही भागात अतिवृष्टी देखील झाली आहे. नदी नाले दुधतडी भरुन वाहत आहेत. दरणांच्या पाणीसाठ्यात वाढ झाली आहे. तसेच काही भागात जास्त पाऊस पडल्यामुळं शेती पिकांचे देखील नुकसान झाले आहे. अशातच पुन्हा राज्यात मुसळधार पावसाचा इशारा देण्यात आली आहे.

**कोणकोणत्या जिल्ह्यात पडणार पाऊस?**

- **कोकण विभाग :** ठाणे, मुंबई, रायगड, रत्नागिरी - हलका ते मध्यम पाऊस.
- **पश्चिम महाराष्ट्र :** पुणे, सातारा, सांगली, सोलापूर - घाटभागात वाढलेला पर्जन्य अंदाज.
- **मराठवाडा व विदर्भ :** नाशिक, धुळे, जळगाव, अमरावती, नागपूर, वर्धा - विजेसह मध्यम पाऊस, वाऱ्याचा वेग ३० ते ५० किमी/तास.
- **अलर्ट नसलेले जिल्हे :** गोंदिया, भंडारा, नंदुरबार, लातूर - कोरडे हवामान.

## धुराचे लोट, पोलिसांची फौज, चर्चगेट स्टेशनवर आग

**■मुंबई । प्रतिनिधी :**

मुंबईच्या चर्चगेट रेल्वे स्थानकातील एका केकच्या दुकानाला आग लागल्याची घटना घडली आहे. गुरुवारी संध्याकाळी ५.३० च्या सुमारास ही घटना घडली. शॉर्ट सर्किटमुळे ही आग लागल्याची प्राथमिक माहिती पश्चिम रेल्वेच्या अधिकाऱ्यांनी दिली आहे. सुदैवाने, या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही. पश्चिम रेल्वेचे सीपीआरओ विनित अभिषेक यांनी दिलेल्या माहितीनुसार, परिस्थिती आता पूर्णपणे नियंत्रणात आहे. आगीची माहिती मिळताच, अग्निशमन दलाच्या अनेक गाड्या तात्काळ घटनास्थळी दाखल झाल्या. त्यांनी आग विझवण्यासाठी शर्थीचे प्रयत्न केले. या आगीमुळे चर्चगेट रेल्वे स्थानकात मोठ्या प्रमाणात धुराचे लोट पसरले होते. ज्यामुळे स्थानकातील सबवे बंद करण्यात आला. तसेच आजूबाजूचा परिसर तातडीने रिकामी करण्यात आला. तसेच, प्रवाशांनाही सुरक्षित ठिकाणी हलवण्यात आले.

**स्थानकात मोठ्या प्रमाणात धुराचे लोट**

मिळालेल्या माहितीनुसार, ही आग लागल्याच्या सुरुवातीला स्थानकात मोठ्या प्रमाणात धूर पसरला होता, ज्यामुळे काही काळ गोंधळाची परिस्थिती निर्माण झाली होती. मात्र, तातडीने पश्चिम रेल्वेचे अधिकारी घटनास्थळी पोहोचले आणि अग्निशमन दलाच्या मदतीने आगीवर नियंत्रण मिळवण्यात यश आले. पोलीस यंत्रणाही घटनास्थळी उपस्थित होती आणि त्यांनी गर्दीचे व्यवस्थापन करून परिस्थिती नियंत्रणात आणण्यास मदत केली.



**पश्चिम रेल्वेचे पीआरओ काय म्हणाले?**

चर्चगेट रेल्वे स्थानकातील दुकानात शॉर्ट सर्किट झाल्याने ही आग लागल्याची माहिती समोर आले आहे. यावेळी सुरुवातीला मोठ्या प्रमाणात धूर आला. त्यानंतर आग लागली. या घटनेनंतर तात्काळ पश्चिम रेल्वेच्या अधिकाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेतली. त्यानंतर शर्थीचे प्रयत्न करत या आगीवर नियंत्रण मिळवण्यात यश आले. यात कोणतीही जीवितहानी झालेली नाही. सध्या चर्चगेट रेल्वे स्थानकातील सर्व परिस्थिती नियंत्रणात आली आहे, अशी माहिती पश्चिम रेल्वेचे सीपीआरओ विनीत अभिषेक यांनी दिली.

**पश्चिम रेल्वेच्या वाहतुकीवर परिणाम**

या घटनेमुळे काही काळासाठी पश्चिम रेल्वेच्या वाहतुकीवर थोडा परिणाम झाला होता, परंतु आगीवर नियंत्रण मिळवल्यानंतर परिस्थिती पूर्वपदावर आणण्यात आली. शॉर्ट सर्किटमुळे ही आग लागल्याचे निष्पन्न झाले असून, भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी आवश्यक ती खबरदारी घेतली जाईल, असे अधिकाऱ्यांनी सांगितले. प्रवाशांच्या सुरक्षिततेला प्राधान्य देत तात्काळ उपाययोजना केल्याने मोठी दुर्घटना टळली.

## मराठा समाजाने तयार केली विवाह आचार संहिता

**■पुणे । प्रतिनिधी :**

पुणे येथील मुळशी येथे वैष्णवी हगवणे हीने हुंड्यापायी जीवन संपवल्याची घटना घडल्यानंतर आता मराठा समाजाने विवाह आचारसंहिता तयार केली आहे. यापुढे मराठा समाजात हुंडा घेणाऱ्या कुटुंबाशी कोणतेही रोटी बेटी व्यवहार करणार नसल्याचे म्हटले आहे. 'मराठा समाज जागा हो, मुलीच्या रक्षणाचा धागा हो, आपली लेक आपली लढाई' अशी भूमिका मांडली. या पत्रकार परिषदेत श्रीकांत शिरोळे, भानुप्रताप बर्गे, श्रीमंत कोकाटे यांनी भूमिका मांडली.



**काही महत्त्वाच्या सूचना आणि नियमावली**

- विवाह ठरविताना दोन्ही कुटुंबीयांच्या पार्श्वभूमी बाबत सखोल माहिती घ्यावी
- तरुण-तरुणी यांची बैठक घेऊन चर्चेद्वारे त्यांच्याकरिता एक आचारसंहिता ठरवली जाईल
- महिलांकरिता एक बैठक घेऊन चर्चेद्वारे एक आचारसंहिता ठरवली जाईल
- प्रतिष्ठेच्या संकल्पना बदलाव्या लागतील त्यासाठी मराठा समाज प्रयत्न करेल
- पिढ्यानपिढ्यांची मानसिकता बदलण्यास काही कालावधी जाईल याकरिता आवश्यक जन जागृती सातत्याने मराठा समाज प्रयत्न करेल
- आदर्श विवाह घडवून आणणाऱ्या कुटुंबाचा समाजाने गौरव करावा, तसेच समाजातील आदर्श विवाह सोहळ्याचे अनुकरण करण्यात येईल
- मुला आणि मुलींच्या शिक्षणाला प्राधान्य द्यावे
- येणाऱ्या काळामध्ये मराठा समाज इतर सर्व समाजाला बरोबर घेऊन सर्व नियमावली आणि आचारसंहिता याबाबत चर्चा करून संपूर्ण समाजासाठी त्याची अंमलबजावणी करण्याकरता प्रयत्न करेल
- यावरील सर्व बाबी अंमलात आणण्यासाठी समाजातील काही जबाबदार आणि कर्तव्यदक्ष व्यक्तीची समिती अथवा मंडळ स्थापन केले जाईल. यामध्ये सहभागी कोणतीही व्यक्ती वैयक्तिक स्वार्थासाठी राजकीय व्यावसायिक सामाजिक इत्यादी गैरफायदा येणाऱ्या मानसिकतेची नसावी याची पूर्ण खात्री केली जाईल
- वरीलप्रमाणे गावागावात समिती नेमून काही अनुचित प्रकार होत असल्यास मध्यस्थी करून त्यांना रोखावे

पुण्यात मराठा समाजाची नुकतीच बैठक झाली. पुण्यातील वैष्णवी हगवणे यांच्या मृत्यू प्रकरणानंतर मराठा समाज बैठक पुण्यातील सेंट्रल पार्क हॉटेल येथे या संदर्भात बैठक झाली. मराठा समाजाने विवाह सोहळ्या संदर्भातील काही प्रमुख आचारसंहिता यावेळी जाहीर केली. मराठा समजातील धुरिणांनी यावेळी हुंडा देणार नाही आणि हुंडा घेणार नाही असा दंडक घालून दिला आहे. ज्या कुटुंबामध्ये महिलांचा छळ होतो हुंडा घेतला जातो, त्या कुटुंबाशी समाज रोटी - बेटी व्यवहार करणार नाही तसेच ते कुटुंब मराठा समाजातून बहिष्कृत केले जाईल असाही निर्णय यावेळी घेण्यात आला.

**सामूहिक विवाह सोहळयांना प्राधान्य**

ज्या महिलेचा सासरच्यांकडून छळ होत असेल, त्यावेळी तिचे माहेरचे लोक ठामपणे तिच्यापाठीशी उभे राहतील. कोणत्याही प्रकारचे ओंगळवाणे प्रदर्शन न मांडता विवाह सोहळे साधेपणाने आणि वेळेवर केली जातील. तसेच मानपानाचे सामाजिक प्रदर्शन केले जाणार नाही, जावई मान आदी सर्व मान कौटुंबिक स्वरूपात केले जातील. यापुढे मराठा समाज सामूहिक विवाह सोहळ्यांना प्राधान्य देईल असे-ही यावेळी ठरविण्यात आले.

विवाह सोहळ्यात एकच व्यक्ती आशीवार्दाच्या स्वरूपातील भाषण देईल. विवाह सोहळा कमीत कमी पाहुण्यांमध्ये पार पडेल. विवाह सोहळ्यातील अनावश्यक खर्च टाळून मुलगी आणि मुलाच्या नावे एफडी केली जाईल, तसेच काही रक्कम गरजवंतांना मदत स्वरूपात दिली जाईल असेही यावेळी ठरवले गेले.

**विवाह सोहळयाचा खर्च ५०–५०, प्री–वेडिंग शूट टाळणार**

वरातीमधील कर्ण कर्कश्य डीजेचा आवाज आणि त्यावरील विभत्स नृत्यं बंद केली जातील, तसेच प्रदूषणयुक्त फटाके वाजवले जाणार नाहीत. यापुढे आता कोणत्याही विवाहाचे प्री-वेडिंग शूट टाळले जाईल. विवाह सोहळ्याचा खर्च वर आणि वधू पक्षाने अर्धा - अर्धा करावा असे ठरविण्यात आले आहे.

## २९ लाख ८७ हजार ४२२ गुंतवणूकदार, २५०० कोटींची फसवणूक
### ५६ आरोपी अन् ३१ गुन्हे महाराष्ट्रातील सर्वात मोठा घोटाळा

**■मुंबई । प्रतिनिधी :**

महाराष्ट्रातील हजारो ठेवीदारांची आर्थिक फसवणूक करणाऱ्या मैत्रेय प्लॉट्स ॲण्ड स्ट्रक्चर्स प्रा. लि. आणि मैत्रेय सुपरस्ट्रक्चर्स प्रा. लि. या कंपन्यांविरोधात आता सरकार निर्णायक आणि ठोस कारवाई करत आहे. मंत्रालयात गृहराज्यमंत्री योगेश कदम यांच्या अध्यक्षतेखाली या प्रकरणासंदर्भात महत्त्वपूर्ण बैठक पार पडली.

मैत्रेय ग्रुप प्रकरणात २९ लाख ८७ हजार ४२२ गुंतवणूकदारांची सुमारे २५०० कोटी रुपयांची फसवणूक झाल्याचे समोर आले आहे. या प्रकरणी आत्तापर्यंत ३१ गुन्हे नोंदविण्यात आले असून, मुख्य संचालकांसह एकूण ५६ आरोपींविरोधात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

आतापर्यंत सदर प्रकरणी ज्या मालमत्ता महाराष्ट्र ठेवीदारांच्या (वित्तीय संस्थांमधील) हितसंबंधाचे संरक्षण अधिनियम, १९९९ अन्वये संरक्षित केलेल्या आहेत त्यांचे मुल्यांकन पुढील ६ महिन्यांत पूर्ण करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. प्रस्तूत प्रकरणी संरक्षित केलेल्या मालमत्तांचे मूल्य १५०० कोटी रुपये होण्याचा अंदाज आहे. मूल्यांकन पूर्ण झाल्यानंतर पुढील कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून ८ ते ९ महिन्यांच्या कालावधीत गुंतवणूकदारांना पैसे परत देण्याची प्रक्रिया चालू करावी असे निर्देश देण्यात आले.



सदर पार पडलेल्या बैठकीत गृहराज्यमंत्री योगेश कदम यांनी स्पष्टपणे सांगितले की, "ठेवीदारांचे हित हेच शासनाचे सर्वोच्च प्राधान्य आहे. अशा आर्थिक फसवणुकीच्या घटनांना पूर्णविराम देण्यासाठी शासन कटिबद्ध आहे."

महाराष्ट्र ठेवीदारांच्या (वित्तीय संस्थांमधील) हितसंबंधाचे संरक्षण अधिनियम, १९९९ अन्वये होत असलेल्या या कारवाईचे अधिकाऱ्यांनी गांभीर्य लक्षात घेऊन, कालबध्द कार्यक्रम तयार करुन गुंतवणूकदारांना त्यांची रक्कम परत देण्याबाबत ठोस कारवाई करण्याबाबत सूचना देण्यात आल्या.

राज्यातील अशा स्वरूपाच्या सर्वच प्रकरणांचा सखोल आढावा घेण्यात येत असून, "शासन ठेवीदारांच्या पाठीशी ठामपणे उभे आहे. आर्थिक फसवणूक करणाऱ्या कंपन्यांवर कठोर कारवाई केली जाईल. सामान्य गुंतवणूकदारांना न्याय मिळवून देणे, हीच आमची भूमिका आहे," असेही . योगेश कदम यांनी यावेळी स्पष्ट केले.

## त्या १२ मिनिटातच खेळ खल्लास
### शेवटच्या क्षणी अभियंता काय करत होती?

**■पुणे । प्रतिनिधी :**

पुण्यातील हिंजवडी परिसरात एक धक्कादायक घटना घडली आहे. एका आयटी अभियंता तरुणीने बिल्डींगच्या २१व्या मजल्यावरुन उडी मारून स्वतःचे आयुष्य संपवले आहे. या तरुणीने नैराश्यातून इतके टोकाचे पाऊल उचलले असल्याचे म्हटले जात आहे. तसेच तिने आत्महत्या करण्यापूर्वी एक चिठ्ठी लिहिल्याचे तपासात स्पष्ट झाले आहे. आता तरुणीने आत्महत्या करण्यापूर्वी नेमकं काय केलं हे सीसीटीव्हीमध्ये समोर आलं आहे. अभिलाषा भाऊसाहेब कोथंबिरे असे या आयटी अभियंताचे नाव आहे. 'सॉरी मला माफ करा, मी हे स्वच्छेने करत आहे, माझी आता जगायची इच्छा संपली आहे...' अशी चिठ्ठी लिहून २५ वर्षीय अभिलाषाने हिंजवडीमधील द क्राऊन ग्रीन सोसायटीच्या २१ व्या मजल्यावरून उडी घेत आत्महत्या केली. ही घटना ३१ मे च्या पहाटेच्या सुमारास घडली आहे.




**खोलीतून सापडली चिठ्ठी**

प्राथमिक दृष्ट्या तिने नैराश्यातून आत्महत्या केल्याचं म्हटले जात आहे. तिच्या खोलीची झाडाझडती घेतली असता तिने लिहिलेली सुसाइट नोट सापडली आहे. त्यावर सॉरी मला माफ करा, मी हे स्वच्छेने करत आहे, माझी आता जगायची इच्छा संपली आहे असे लिहिलेलं आढळून आले आहे. याबाबत अधिक तपास हिंजवडी पोलिस करत आहेत.

**शेवच्या १२ मिनिटात काय घडलं?**

अभिलाषा घटनेच्या दिवशी पहाटे ४.३० सुमारास दुचाकीने सोसायटीच्या आवारात आली. त्यानंतर ती लिफ्टने २१ व्या मजल्यावर आपल्या घरी जात पहाटे ४.४२ सुमारास तिने आत्महत्या केल्याचं निदर्शनास आले आहे. अभिलाषाच्या शव विच्छेदन अहवालात तिच्या शरीरावरील महत्वाच्या अवयवांना गंभीर इजा झाल्याचे म्हटले आहे. या प्रकरणी हिंजवडी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक कन्हैया थोरात यांनी अभिलाषाच्या मृत्यूची आकस्मिक नोंद केली असून , या घटनेत कोणत्याही प्रकारचा घातपात अथवा संशयास्पद काही संकेत आढळून आले नसल्याचे म्हटले आहे.

## सिंधुताईंच्या आश्रमातील मुली लग्नासाठी देतो म्हणत पैशांची मागणी
### फसवणूक करणाऱ्या भामट्यांविरुद्ध गुन्हा

**■पुणे । प्रतिनिधी :**

अनाथांची माय म्हणून महाराष्ट्रासह देशाला परिचित असलेल्या दिवंगत सिंधुताई सपकाळ यांच्या नावाचा गैरवापर करुन तरुणाईला फसवण्याचा प्रकार समोर आला आहे. सिंधुताई सपकाळ यांच्या पुण्यातील आश्रमात लग्नासाठी मुली आहेत असं म्हणत अनेकांची फसवणूक झाल्याचा प्रकार समोर आला आहे.

लग्नासाठी इच्छुक असलेल्यांना फोन करून या सगळ्या संदर्भातली माहिती दिली जाते आणि त्यानंतर रजिस्ट्रेशन म्हणून १५,००० रुपये फोन पे ने किंवा गुगलपेने मागवले जातात. या सगळ्या संदर्भात दोन दिवसांपूर्वी सपकाळ यांनी सासवडमध्ये तक्रार दिली होती. मात्र, दोन दिवसांनी सासवड पोलिसांनी गुन्हा दाखल करण्याचा निर्णय घेतला. यासंदर्भात वृत्त समोर आल्यानंतर पोलिसांनी आता गुन्हा दाखल करण्याचा निर्णय घेतला आहे. मात्र, लग्नाळू मुलांच्या पालकांची व नातेवाईकांची होणारी ही फसवणूक गंभीर असल्याचे पाहायला मिळत आहे.



**मुलींचे कपडे घालायचा अन्...**

मालाड पोलिसांनी सांगितल्यानुसार आरोपी जेव्हा घराबाहेर पडायचा तेव्हा त्याच्या मुलीचे कपडे त्याच्या बॅगेत घेऊन जायचा. तो रात्री उशिरा रेल्वे ट्रॅकजवळ जायचा. मुलींचे कपडे घालून मुंबई शहरात जाऊन सोने, चांदीचे दागिने आणि पैसे चोरायचा. जेव्हा पोलिसांनी आरोपीचा शोध घेतला तेव्हा तो रेल्वे ट्रॅककडे जाताना दिसायचा. त्यानंतर मात्र तो गायब व्हायचा. कारण रेल्वे ट्रॅकवर सीसीटीव्ही कॅमेरे नव्हता. ही बाब समोर आल्यानंतर मालाड पोलिसांच्या डिटेक्शन टीमने १५ दिवस मालाड रेल्वे ट्रॅकवर आरोपीचा माग काढून त्याला अटक केली. त्यासाठी पोलिसांनी १०० हून अधिक सीसीटीव्ही कॅमेरे तपासले.

या बातमीनंतर सिंधुताई सपकाळ यांच्या नावाचा गैरवापर करत मुलगी लग्नाला देतो म्हणणाऱ्या भामट्यावर फसवणुकीचा गुन्हा दाखल झाला आहे. सिंधुताई सपकाळ यांच्या आश्रमात लग्नासाठी मुली आहेत असं म्हणत अनेकांची फसवणूक झाल्याचा प्रकार समोर आला आहे. फोन करून या सगळ्या संदर्भातली माहिती दिली जाते आणि त्यानंतर रजिस्ट्रेशन म्हणून १५,००० रुपये फोन पे ने किंवा गुगलपेने मागवले जातात. या सगळ्या संदर्भात दोन दिवसांपूर्वी सपकाळ यांनी सासवडमध्ये पोलीस ठाण्यात तक्रार दिली होती.

मात्र, याप्रकरणी दोन दिवसांनी सासवड पोलिसांनी गुन्हा दाखल करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार, ३१९ (४), ३१८ (४), ३५६ (२), आयटी ॲक्ट ६६ या कलम अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मात्र, समाजात मुलांच्या लग्नासाठीची गंभीर प्रश्न असल्याचे पुन्हा एकदा सिद्ध झालं आहे. मुलांच्या लग्नासाठी पालक, नातेवाईक मुलगी मिळावी म्हणून मोजेल ती किंमत मोजायला तयार असल्याचं दिसून येत आहे.

ही बातमी समोर आली आणि त्यानंतर या सोशल मीडियावर हा प्रकार करणाऱ्या भामट्यांवर फसवणुकीचा गुन्हा दाखल केला आहे. मात्र, ज्या सिंधुताईंनी आपलं संपूर्ण आयुष्य अनाथ, व गोरगरिबांच्या लेकरांसाठी व्यतित केलं. त्या सिंधुताईंच्या आश्रमासंदर्भात एवढा गंभीर प्रकार समोर आल्यानंतर गुन्हा दाखल करायला दोन दिवस का लागले, असा प्रश्न उपस्थित होत आहे.



## संपादकीय...

संपादक
दिपक मोरेश्वर नाईक

# पण प्रश्न अनुत्तरीतच!

या वर्षाच्या अखेरीपर्यंत बिहार विधानसभा निवडणूक होईल. भाजपप्रणित एनडीए अर्थात राष्ट्रीय लोकशाही आघाडीतील घटक पक्ष असलेल्या विद्यमान मुख्यमंत्री नितीश कुमार यांचा जनता दल युनायटेड पुन्हा एकदा भाजपबरोबर या निवडणुकीला सामोरा जाईल. या निवडणुकीत विरोधकांचे समीकरण कसे जुळते, यावरच नितीश कुमार यांचे मुख्यमंत्रीपद अवलंबून आहे. अन्यथा, २०२० प्रमाणेच कमी असतानाही भाजप नितीश कुमार यांनाच हे पद बहाल करून केंद्रातील पाठिंब्याची परतफेड करेल. तर दुसरीकडे, एनडीएला सत्तेपासून रोखण्यासाठी काँग्रेसला पुढाकार घेऊन विरोधकांची मोट बांधावी लागेल. आतापासून प्रत्येक पक्षाने मोर्चेबांधणी सुरू केली असली तरी, प्रत्यक्षात तारखा जाहीर झाल्यानंतर त्याला वेग येईल. मात्र, याआधी केंद्रीय निवडणूक आयोगाने एक महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. काँग्रेससह सर्वच विरोधी पक्षांचा ईव्हीएमला आक्षेप आहेच, पण आता मतदानाच्या आकडेवारीबाबतही शंका उपस्थित करण्यात आली आहे. विशेषतः महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीनंतर महाविकास आघाडीच्या सर्वच घटक पक्षांनी, भाजपप्रणित महायुतीच्या विजयामागे हा मतदान टक्केवारीचा घोळ असल्याचा आरोप केला आहे. याच अनुषंगाने केंद्रीय निवडणूक आयोगाने बिहार निवडणुकीपासून अद्ययावत तंत्रज्ञानाचा वापर करून नवीन प्रणाली अंमलात आणण्याचे ठरविले आहे. प्रत्येक मतदान केंद्राच्या पीठासीन अधिकाऱ्यांकडून दर दोन तासांनी ईसीआयएनईटी ॲपच्या माध्यमातून मतदानाच्या टक्केवारीची माहिती नोंदवण्यात येणार आहे. त्यानुसार ती लगेच जारी करण्यात येईल. याशिवाय, मतदान प्रक्रिया पूर्णपणे पार पडल्यानंतर निवडणूक अधिकारी मतदान केंद्र सोडण्यापूर्वी मतदानाची अंतिम आकडेवारी या यंत्रणेमार्फत नोंदवतील. त्यानुसार मतदानाची एकूण टक्केवारी निवडणूक प्रक्रियेनंतर अर्ध्या तासात उपलब्ध होईल, अशी अपेक्षा आहे. यापूर्वी, मतदान आकडेवारीचा डेटा क्षेत्रीय अधिकाऱ्यांकडून कागदोपत्री जमा केला जात असे आणि नंतर ही माहिती फोन कॉल, एसएमएस किंवा मेसेजिंग ॲप्सद्वारे निवडणूक निर्णय अधिकाऱ्याकडे पाठवली जात असे. ही माहिती दर दोन तासांनी एकत्रित करून व्होटर टर्नआऊट (व्हीटीआर) ॲपवर अपलोड केली जात असे. पण आता नव्या तंत्रज्ञानामुळे ही वेळखाऊ प्रक्रिया संपुष्टात येईल. खुद्द केंद्रीय निवडणूक आयोगानेच मंगळवारी ही माहिती दिली आहे. डिजिटल इंडियाचा घोषा करत असताना, अशा प्रकारे नव्या तंत्रज्ञानाची कास धरणे आवश्यकच आहे. पण साधारणपणे आयोगाचे प्रश्न निकाली काढून पुढे चालणे कधीही योग्य ठरते. निवडणूक आयोगाकडून अद्याप तसे झालेले नाही. महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीतील मतदान टक्केवारीचा घोळ विरोधकांनी अधोरेखित केला होता. निवडणूक आयोगाच्या पारदर्शक प्रक्रियेवरच प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात आले होते. एवढेच नव्हे तर, केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांचे पती अर्थशास्त्रज्ञ परकला प्रभाकर यांनीही या वाढीव टक्केवारीबद्दल शंका उपस्थित केली होती. राज्यात २० नोव्हेंबरला मतदान झाले. त्यावेळी सकाळी ९ वाजेपर्यंत ६.६१ टक्के, सकाळी ११ वाजपर्यंत १८.१४ टक्के, दुपारी १ वाजेपर्यंत ३२.१८ टक्के, दुपारी ३ वाजेपर्यंत ४५.५३ टक्के आणि सायंकाळी ५ वाजेपर्यंत ५८.२२ टक्के मतदान नोंदवले गेले. पण नंतर केंद्रीय निवडणूक आयोगाने रात्री उशिरा ११.३० वाजताचे अपडेट्स म्हणून ६५.०२ टक्के मतदान झाल्याचे जाहीर केले. तर, राज्याच्या मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांनी दुसऱ्या दिवशी ६६.०५ टक्के मतदान झाल्याचे सांगितले. या वाढीव सुमारे साडेसात टक्के मतदानाचे पुरावे विरोधकांनी केंद्रीय निवडणूक आयोगाकडे मागितले. एवढेच नव्हे तर, विधानसभा निवडणूक २०१९ ते लोकसभा निवडणूक २०२४ या कालावधीत महाराष्ट्रात ३२ लाख नव्या मतदारांची नोंदणी झाली. पण लोकसभा २०२४ ते विधानसभा २०२४ या अवघ्या पाच महिन्यांत ३९ लाख नव्या मतदारांची नावे याद्यांमध्ये समाविष्ट करण्यात आली, याकडे काँग्रेस नेते आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी लक्ष वेधले. या वाढलेल्या मतदारांचे फोटो आणि पत्त्यासह अन्य तपशीलही राहुल गांधी यांनी निवडणूक आयोगाकडे मागितला होता. यासंदर्भात त्यांनी घेतलेल्या पत्रकार परिषदेला शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे खासदार संजय राऊत आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे उपस्थित होत्या. मतदानाची टक्केवारी वाढल्याचा दावा निवडणूक आयोगाने फेटाळला आहे. महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत सकाळी ७ ते सायंकाळी ६ वाजण्याच्या दरम्यान ६ कोटी ४० लाख ८७ हजार ५८८ नागरिकांनी मतदान केले. म्हणजेच, दर तासाला सरासरी ५८ लाख मतदान झाले. त्यानुसार, शेवटच्या दोन तासांत सुमारे १ कोटी १६ लाख मतदान झाले असते. तथापि, प्रत्यक्षात मात्र दोन तासांत ६५ लाख मतदान झाले आणि ते सरासरीपेक्षा कमी आहे, असा खुलासा आयोगाने केला. हा खुलासा निव्वळ तर्कशुद्ध नसून तर्कावर आधारित आहे. याशिवाय, ३९ लाख नव्या मतदारांच्या नोंदींच्या मुद्याचे निराकरण झालेले नाही. त्यामुळे नव्या तंत्रज्ञानाचा वापर करण्याचे निवडणूक आयोगाने उचललेले पाऊल स्वागतार्ह आहेच, पण या अनुत्तरीत प्रश्नांची उकलही अपेक्षित आहे.

# प्रकल्पबाधितांना वाली कोण?



**विविध प्राधिकरणांमार्फत रस्ते, नाले, उड्डाणपूल असे प्रकल्प राबवले जातात. या प्रकल्पांच्या विस्तारीकरणामुळे दरवर्षी हजारो कुटुंबे बाधित होत आहेत. मात्र, प्रकल्पबाधितांची घरे ऐन पावसाळ्याच्या तोंडावर तोडण्यात येत असल्याने नागरिकांचे हाल होत आहेत. विविध प्रकल्पांमध्ये हजारो कुटुंबे बेघर होत असताना, महापालिकेकडे त्या तुलनेत घरे उपलब्ध नसल्याने ह्वप्रकल्पबाधितांना वाली कोण?ह्व असा सवाल उपस्थित झाला आहे.**

गेले काही दशकांमध्ये मुंबईचा चेहरामोहरा कैकपटीने बदलला आहे. पोटाची खळगी भरण्यासाठी गरीबांपासून श्रीमंत मुंबईत विसावले. कचरापट्टी, नाले अशा मोकळ्या दिसणाऱ्या ठिकाणी झोपडीदादांनी राजकारणी, महापालिका अधिकारी आणि पोलिसांच्या संगनमताने झोपड्या उभारल्या. झोपड्यांची संख्या दिवसेंदिवस वाढून तीच एक गंभीर समस्या ठरली. यावर उपाय म्हणून झोपडपट्टी पुनर्वसन योजना आणली. ही योजनाही झोपडपट्टीवासीयांपेक्षा राजकारणी आणि अधिकाऱ्यांच्या हिताची बनली आहे.

दिवसेंदिवस विस्तारणाऱ्या मुंबईत विविध पायाभूत सेवा-सुविधा निर्माण करण्यासाठी मुंबई महानगरपालिका, एमएमआरडीए अशा संस्था विविध नागरी प्रकल्प राबवत आहेत. मुंबईत प्रकल्प राबविण्यासाठी पुरेशी जागा उपलब्ध नसल्याने नागरी वस्तीमधून अशा प्रकल्पांना जागा मिळवली जाते. यामध्ये दरवर्षी हजारो कुटुंबे प्रकल्पबाधित होत आहेत. या कुटुंबांचे पुनर्वसन करण्यासाठी माहुल येथे घरे उभारण्यात आली आहेत. या घरांमध्ये हजारो प्रकल्पबाधितांचे पुनर्वसन करण्यात आले आहे. मात्र, हा परिसर प्रदूषणामुळे राहण्यास योग्य नसल्याने प्रकल्पबाधितांकडून माहुलमधील घरे घेण्यास विरोध होत आहे.

रासायनिक कंपन्यांमुळे हा परिसर प्रदूषित झाला आहे. त्यामुळे या ठिकाणी प्रकल्पबाधितांचे पुनर्वसन करू नये, असे आदेश न्यायालयाने दिले आहेत. मात्र, मुंबईत प्रकल्पबाधितांसाठी घरे उपलब्ध नसल्याने महानगरपालिका प्रकल्पबाधितांना माहुलच्या घराचा आग्रह धरत आहे. यामध्ये प्रकल्पबाधित पूर्णतः उद्ध्वस्त होत आहेत. याचा विचार ना पालिका अधिकारी करत आहेत ना सत्ताधारी. कष्टाच्या पैशातून पै-पै जमा करून नागरिक हक्काचा निवारा खरेदी करतात. घरासाठी उपाशी राहून लोक ऋण फेडतात. पण अचानक एके दिवशी त्यांच्या घराच्या ठिकाणाहून कोणता तरी प्रकल्प जात असल्याचे समजते, आणि त्याचवेळी स्वप्नांचा चुराडा होतो.

दहा बाय दहाच्या झोपडीत गुण्या-गोविंदाने राहणाऱ्या प्रकल्पबाधित कुटुंबांचे आयुष्य क्षणार्धात बदलू लागते. नोकरी, मुलांच्या शाळा अशी सर्व गणिते जुळवून राहणाऱ्या नागरिकांना पुन्हा नव्याने आयुष्याची सुरुवात करण्याची वेळ येते आणि नागरिकांचे जीवनचक्र बदलते. प्रकल्पबाधितांचे पुनर्वसन ३ किलोमीटर अंतरामध्ये करण्याचा मुंबई महानगरपालिकेचा कायदा आहे. हा कायदा गोरगरीबांसाठी बिल्कूल नाही. प्रकल्पबाधित झाला की घराच्या बदल्यात घर देणे बंधनकारक असतानाही महापालिका अधिकारी जोरजबरदस्तीने प्रकल्पबाधितांना बेघर करतात. नागरिकांचे जीवनमान सुधारण्यासाठी राबविण्यात येणाऱ्या प्रकल्पांमध्ये अनेक कुटुंबांच्या संसाराची राखरांगोळी होत आहे. याचे कोणतीही यंत्रणा मूल्यमापन करत नाही. आपले काम झाले की प्रकल्पबाधित कोण, हा विचारही पालिका अधिकारी आणि प्रशासनाला कधी शिवत नाही.

पावसाळ्यात अनधिकृत व अधिकृत झोपड्या न तोडण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे. हजेरीबहाद्दर महापालिकेचे अधिकारी, कर्मचारी मे महिन्याच्या अखेरच्या आठवड्यात घरे तोडण्याच्या नोटिसा देऊन गोरगरीबांची झोप उडवतात. यातून निदान पावसाळ्यापुरते तरी छप्पर वाचविण्यासाठी लोक न्यायालयात दाद मागतात. यासाठी पुन्हा नागरिकांना वकिलांच्या मोठ्या शुल्काला सामोरे जावे लागते. न्यायालय कधी नागरिकांना दिलासा देते तर कधी त्यांची याचिका फेटाळून लावते. या चक्रातून नागरिकांना अखेर भर पावसाळ्यात विस्थापित होण्याची वेळ येते. पर्यायी घर मिळाले नसतानाच पालिका घरावर बुलडोझर चालवून रिकामे करते. नागरिकांना घर किंवा आर्थिक मोबदला हे पर्याय देण्यात येत असले तरी आजवर पालिकेने प्रकल्पबाधितांना त्यांच्या घराचा मोबदला दिलेला नाही. नागरिकांना ३ किलोमीटर अंतरामध्ये घरही द्यायचे नाही आणि त्याचा आर्थिक मोबदलाही द्यायचा नाही- यावर पालिकेला एकही लोकप्रतिनिधी प्रश्न विचारण्यास तयार नाही.

प्रकल्पबाधितांचे आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक, आरोग्य असे सर्व प्रकारे नुकसान होते. पण याचा विचार करण्यास विविध प्रशासनातील अधिकाऱ्यांना वेळ नाही. केवळ प्रकल्प पूर्ण करण्याचे लक्ष्य अधिकारी ठेवतात. पण प्रकल्पबाधितांच्या समस्यांशी कोणास देणेघेणे नाही. ऐन पावसाळ्याच्या तोंडावर झोपड्या तोडण्यात येत असल्याने नागरिकांचे संसार रस्त्यावर येतात. पावसाच्या पाण्यात लहान मुले, महिला यांना पदपथावर झोपण्याची वेळ येते. अशा हजारो कुटुंबांना कुणीही वाली नसतो. कितीही आंदोलने केली तरी त्याचा तीळमात्र फरक व्यवस्थेवर पडत नाही. यामध्ये अनेकांना प्राणही गमवावे लागले आहेत. उलट पोलिसी खाक्या गोरगरीबांना तुरुंगवारीस पाठवून आधीच पिचलेल्या नागरिकांची आणखी परवड करतात.

शासन निर्णयानुसार, अधिकृत ठरलेल्या नागरिकांचे पुनर्वसन होणे गरजेचे आहे. मात्र, प्रकल्पबाधित जाहीर होताच त्यांना माहुलसारख्या ठिकाणी पाठविण्याची पालिकेची योजना असते. प्रकल्पबाधितांच्या पुनर्वसनाला पालिकेने प्राधान्य देणे गरजेचे आहे. मुंबईत सध्या सुमारे ७० हजार घरांची तातडीने आवश्यकता आहे. मात्र, एवढ्या मोठ्या संख्येने घरे उभारणे पालिका प्रशासनापुढील मोठे आव्हान आहे. मुलुंड, भांडुप, बोरिवली आदी ठिकाणी प्रकल्पबाधितांसाठी सुमारे १० हजार घरे उभारण्यात येत असली तरी ही घरे तयार होण्यासाठी आणखी काही वर्षांची वाट पहावी लागणार आहे. प्रत्येक झोनमध्ये प्रकल्पबाधितांसाठी घरे उभारण्याची योजना पालिकेने आखली असली, तरी ही घरे उभारण्यात अनेक अडथळे आहेत.

प्रकल्पबाधितांच्या पुनर्वसनासाठी पालिकेने वेळीच पावले न उचलल्यास हा प्रश्न आणखी गंभीर बनणार आहे. प्रकल्पबाधितांना त्यांच्या परिसरात दर्जेदार, राहण्यायोग्य घरे उभारण्यावर लक्ष देणे गरजेचे आहे. अन्यथा यामध्ये प्रकल्पबाधित पूर्णतः उद्ध्वस्त होईल.

# अभिव्यक्तीला संरक्षण

'ऑपरेशन सिंदूर' दरम्यान पुण्यातील महाविद्यालयात शिकणाऱ्या विद्यार्थिनीने समाजमाध्यमावर फॉरवर्ड केलेल्या पोस्टमुळे तिला अटक करण्यात आली होती, याच कारणाने तिला कॉलेजमधूनही काढून टाकण्यात आले होते. मुंबई उच्च न्यायालयाने तिच्या जामिनाचा मार्ग मोकळा करत या 'अतिउत्साही' कारवाईबद्दल राज्य सरकार आणि शिक्षण संस्थेला कठोर शब्दांत फटकारले. खरे तर ही पोस्ट काही वेळातच संबंधित विद्यार्थिनीने काढून टाकली होती आणि या संदर्भात जाहीर माफीही मागितली होती. तिच्या या कृतीकडे दुर्लक्ष करत कारवाई झाल्याचे न्यायालयाचे म्हणणे आहे. एकोणीस वर्षांच्या या मुलीला सुधारण्याची संधी न देताच ही कारवाई झाली. ऑपरेशन सिंदूर दरम्यान संपूर्ण देशभर भयंकर युद्धज्वर पसरला होता.

ही कॉलेजवयीन मुलगी तर सोडाच, मोठी माणसेही याला अपवाद नव्हती. मध्य प्रदेशच्या एका मंत्र्यांनी केलेल्या वादग्रस्त वक्तव्याची दखल तर सर्वोच्च न्यायालयाने घेतली, मात्र त्यांच्या या वक्तव्याबद्दल त्यांना ना त्यांच्या पक्षातून कुणी विचारणा केली, ना त्यांच्या खुर्चीवर आच आली. तरुण विद्यार्थ्यांनी आक्रमकपणे व्यक्त होणे, ही अगदीच सामान्य बाब आहे. त्यातून समाजाला किंवा देशहिताला धोका पोहोचत असेल तर वेगळी गोष्ट; पण 'सरकारविरोधात बोलणे म्हणजे देशविरोधी कृती' अशा बदलत्या व्याख्येमुळे अनेकांची केवळ शैक्षणिक कारकीर्दच नव्हे तर पूर्ण भविष्यच झाकोळून गेले आहे. काही वर्षांपूर्वी जेएनयू मधील विद्यार्थ्यांना अटक झाली. त्यांना दीर्घकाळ जामीन न देता तुरुंगात डांबले होते. प्रस्थापितांविरोधात आवाज उठवणे, आक्रमकपणे व्यक्त होणे हे विद्यार्थ्यांनी जगभर केले आहे.



# विजयोत्सवाला गालबोट

**इंडियन प्रीमियर लीग (आयपीएल) सुरू झाल्यानंतरच्या गेल्या अठरा वर्षांत प्रथमच बेंगळुरू संघाने करंडक उंचावल्यानंतर क्रिकेटप्रेमींना झालेल्या आनंदाचे जल्लोषात नव्हे, तर उन्मादात रूपांतर होऊन त्यामुळे झालेल्या चेंगराचेंगरीत ११ जणांचा मृत्यू होणे धक्कादायक आहे. बेंगळुरूतील चिन्नास्वामी स्टेडियममध्ये बुधवारी संघाच्या सत्कार समारंभासाठी जमलेल्या अलोट गर्दीला आवर घालता न आल्याने झालेल्या चेंगराचेंगरीत ५०हून अधिक जण जखमी झाले आहेत.**

यापूर्वी टी२० वर्ल्डकप जिंकल्यानंतर मुंबईत भारतीय संघाच्या स्वागतासाठी उसळलेल्या गर्दीमुळे पोलिस अधिकाऱ्यांसह अनेकांच्या काळजाचा ठोका चुकला होता. त्या वेळी काही दुर्घटना घडली नाही, हे सुदैव. लोकप्रिय चित्रपट तारे-तारकांना पाहण्यासाठी जमलेल्या गर्दीमुळे घडलेल्या दुर्घटनाही ताज्या आहेत. अतिरेकी क्रिकेटप्रेमात बेशिस्तीची भर आणि अपुऱ्या पडणाऱ्या यंत्रणा यांमुळे बेंगळुरूवासीयांच्या आनंदाच्या क्षणांना दुर्घटनेचे गालबोट लागले. देशात वारंवार घडणाऱ्या या दुर्घटनांबाबत सरकारी यंत्रणा आणि सुज्ञ नागरिकांनीही गांभीयार्ने विचार करण्याची वेळ आली आहे, हे नक्की.

अखेरच्या क्षणापर्यंत रोमांचकारी ठरलेल्या अंतिम सामन्यात बेंगळुरू संघाने पंजाबवर मात करून प्रथमच इंडियन प्रीमियर लीगमध्ये विजय मिळवला आणि 'ई सला कप नम्दे' म्हणजे यंदा कप आमचाच, ही लाखो चाहत्यांची घोषणा खरी केली. मंगळवारी अहमदाबादेतील नरेंद्र मोदी स्टेडियमवर झालेल्या सामन्यात त्यांना १९०, म्हणजे फार मोठ्या धावसंख्येचे आव्हान उभे करता आले नाही; मात्र बेंगळुरूच्या गोलंदाजांनी अचूक मारा करून पंजाबला १८४ धावांत रोखले आणि सामन्यावर वर्चस्व गाजवले. खरे तर मुंबई संघाला पराभूत करून फायनलमध्ये पोहोचलेल्या पंजाबचे आव्हान सोपे नव्हते. श्रेयस अय्यरसारख्या खेळाडूने सेमी फायनल जिंकून दिल्यानंतर पंजाब संघाच्या आशा उंचावल्या होत्या. मात्र, गोलंदाजांच्या माऱ्यापुढे बेंगळुरूने समोर ठेवलेले लक्ष्य पार करणे त्यांना शक्य झाले नाही. 'क्रिकेटमध्ये कोणत्याही क्षणी काहीही घडू शकते,' याची अनेकदा प्रचिती देणारा आयपीएलचा यंदाचा हंगाम अनेक अर्थांनी वैशिष्ट्यपूर्ण ठरला. पहलगाम हल्ल्यानंतर निर्माण झालेल्या तणावामुळे नियोजित वेळापत्रकात बदल करण्यात आले होते; मात्र परिस्थिती निवळल्यानंतर उर्वरित स्पर्धा पार पडली.

भारतीय क्रिकेटसाठी गुणवंतांची खाण ठरलेल्या आयपीएलमध्ये यंदाही काही नव्या प्रतिभाशाली खेळाडूंनी चमक दाखवली. सूर्यकुमार यादव, शुभमन गिल यांच्यासारख्या अनेक क्रिकेटपटूंनी आजवर हा विश्वास सार्थ ठरवला आहे. त्यामध्ये चौदा वर्षांच्या वैभव सूर्यवंशीसह सर्वाधिक धावा करणारा पी. साई सुदर्शन, आयुष म्हात्रे अशा खेळाडूंची यंदा भर पडली. यंदाचे वैशिष्ट्य म्हणजे विजेतेपदाचे दावेदार आणि पूर्वी अनेकदा विजेते ठरलेले मुंबई, चेन्नई असे सारे प्रस्थापित संघ स्पर्धेतून बाजूला गेले होते. भारतीय कसोटी संघात स्थान न मिळालेल्या श्रेयस अय्यरने आपल्या बॅटनेच निवड समितीला उत्तर दिले आहे. प्रारंभीच्या सामन्यांमध्ये पराभव स्वीकारावा लागल्यानंतरही मुंबई संघाने हिंमत न हारता केलेले 'कमबॅक'ही कौतुकास्पद होते.

यंदा दोन्ही माध्यमांतून सुमारे ७५ कोटी प्रेक्षक आणि पाच हजार कोटी मिनिटांचा 'वॉच टाइम' या आकड्यांतून स्पर्धेच्या लोकप्रियतेची झलक मिळते. 'इन्स्टंट' जमान्याला साजेसा वेगवान खेळ आणि त्यातून क्षणोक्षणी निर्माण होणारा थरार यांमुळे २० षटकांचे सामने दिवसेंदिवस लोकप्रिय होत असले, तरी हे अभिजात क्रिकेट नव्हे! त्यामुळे विराट कोहलीसारख्या दिग्गजाचा 'कसोटीला प्राधान्य द्या,' हा सल्ला खेळाच्या भवितव्यासाठी महत्त्वाचा ठरतो. त्याच वेळी, बेंगळुरू येथे घडलेल्या दुर्घटनेतून धडा घेऊन जमणाऱ्या बेफाम गर्दीला आवर कसा घालावा, यासाठी कार्यपद्धत निश्चित करण्याची वेळ आली आहे, हे नक्की.

# नियोजनशून्यतेमुळे अकरावी ऑनलाईन प्रवेशाचा बोजवारा!



अकरावीच्या प्रवेश प्रक्रियेत पारदर्शकता आणण्यासाठी तसेच विद्यार्थी, पालकांच्या विविध महाविद्यालयांमधील अनेक चकरा, त्यामागे खर्ची होणारा वेळ, पैसा आणि श्रम वाचविण्यासाठी यंदाच्या वर्षापासून अकरावीचे प्रवेश ऑनलाईन करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय शिक्षण मंडळाने घेतला. ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेचा निर्णय हा उत्तमच आहे. यात दुमत नाही. परंतु, ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया राबविण्यासाठी जे नियोजन करणे अपेक्षित होते ते न झाल्याने या संपूर्ण व्यवस्थेचा पूर्णपणे बोजवारा उडाला आहे. अकरावीचे ऑनलाईन प्रवेश म्हणजे सध्याच्या घडीला खेळखंडोबा होऊन बसल्याची परिस्थिती आहे.

दरवर्षी दहावीचे निकाल जाहीर झाल्यानंतर अकरावी प्रवेशासाठी विविध महाविद्यालयांमध्ये विद्यार्थी आणि पालकांची मोठी गर्दी उसळत असल्याचे चित्र आपल्याला पाहायला मिळते. अनेक विद्यार्थी आणि त्यांचे पालक हे विविध महाविद्यालयांमध्ये प्रवेश अर्ज मिळवण्यासाठी धडपड करतात. आधी प्रवेश अर्ज मिळविण्याची धडपड. काही बडी महाविद्यालये यासाठी शुल्कही आकारतात. प्रवेश अर्ज मिळाले की मग, ते सविस्तरपणे भरून महाविद्यालयाकडे जमा करण्यासाठी पुन्हा विद्यार्थी, पालकांना रांगेत उभे राहावे लागते.

केवळ एक, दोन महाविद्यालयासाठी नव्हे तर किमान पाच ते सात महाविद्यालयांमध्ये अर्ज भरण्याचा खटाटोप करावा लागतो. कारण, पसंतीचे महाविद्यालय आणि आपल्याला हव्या असलेल्या शाखेत प्रवेश मिळविण्यासाठी एक ते दोन महाविद्यालयांमध्ये अर्ज भरणे पुरेसे नसते. किमान पाच ते सात महाविद्यालयांमध्ये अर्ज करणे भाग असते. अर्ज केल्यानंतर संबंधित महाविद्यालयामध्ये आपल्याला प्रवेश मिळणार की नाही, यासाठी कट ऑफ लिस्टची (गुणवत्ता यादी) प्रतीक्षा करावी लागते. लिस्टमध्ये नाव लागल्यानंतरच विद्यार्थ्यालर्ा पुढील शुल्क भरून अकरावीसाठी प्रवेश मिळतो.

अनेकदा तर असे पाहायला मिळते की, एखाद्या विद्यार्थ्याला दहावीच्या परीक्षेत उत्तम गुण मिळल्यानंतरही त्याला पसंतीच्या महाविद्यालयात आणि आवश्यक असणाऱ्या शाखेत प्रवेश मिळत नाही. परंतु, त्याच महाविद्यालयात आणि पसंतीच्या शाखेत मात्र कमी गुण असणाऱ्या विद्यार्थ्यांनाही प्रवेश मिळतो. मॅनेजमेंट कोटा असो वा अन्य कोणताही. विशिष्ट कोट्यांद्वारे का होईना, परंतु कमी गुण मिळालेल्या विद्यार्थ्यांनाही त्याच ठिकाणी प्रवेश मिळाल्यानंतर उत्तम गुणांनी उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचे मानसिक खच्चीकरण झाल्याशिवाय राहत नाही.

पैशांच्या जोरावर उत्तम महाविद्यालयात अनेक विद्यार्थ्यांना प्रवेश मिळविता येत असेल, तर गुणवत्तेचा काय फायदा, असे प्रश्न विद्यार्थी तसेच त्यांच्या पालकांना पडल्यावाचून राहत नाहीत. महाविद्यालये गुणवत्तेच्या आधारे नेमक्या किती विद्यार्थ्यांना आणि विशिष्ट कोट्यांद्वारे किती विद्यार्थ्यांना अकरावीला प्रवेश देतात, हे कोणालाच कळत नसते. त्यामुळे महाविद्यालयांमधील अकरावीसाठीची ही प्रवेश प्रक्रिया अपारदर्शकतेची आणि अनियमिततेची असल्याची भावना गेल्या कैक वर्षांपासून अनेकांमध्ये आहे. त्यामुळे या सर्व प्रक्रियेला छेद देऊन ही सर्व यंत्रणाच बदलावी, अशी भावना अनेकांची होती.

शिक्षण मंडळाने यंदापासून अकरावीचे प्रवेश हे महाविद्यालयांद्वारे ऑफलाईन पद्धतीने करण्याऐवजी ऑनलाईन पद्धतीने करण्याचा निर्णय घेतला. जेणेकरून दरवर्षी अकरावी ऑफलाईन प्रवेशादरम्यान विद्यार्थी आणि पालकांची ससेहोलपट किमान यापुढे तरी थांबावी तसेच या प्रक्रियेत पारदर्शकता यावी. या उद्देशानेच अकरावी प्रवेश प्रक्रिया यंदाच्या वर्षीपासून ऑनलाईन करण्यात आली. निर्णयामागचा उद्देश जरी योग्य असला तरी सध्या ही प्रक्रिया पार पाडताना ज्या आव्हानांना विद्यार्थी आणि पालकांना सामोरे जावे लागत आहे, ते पाहता अनेक जण हा ऑनलाईनचा खेळखंडोबा पाहता जुनी ऑफलाईनची प्रक्रियाच परवडली, असे म्हणू लागले आहेत.

अकरावी ऑनलाईन प्रवेशाबाबत रोगापेक्षा इलाज भयंकर अशी परिस्थिती होऊन बसली आहे. अनेक विद्यार्थी आणि पालकांना अकरावीच्या ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेदरम्यान विविध अडचणींना सामोरे जावे लागत आहे. अकरावी ऑनलाईन प्रवेशासाठीचे संकेतस्थळ अगदी कासवगतीने चालत असल्याचा वाईट अनुभव अनेकांना येत आहे. आपल्याकडे इंटरनेटचा वेग हा ५ जीच्या गतीने काम करतो. परंतु, अकरावी ऑनलाईन प्रवेशासाठीचे महत्त्वाचे संकेतस्थळ हे अगदी कासवगतीने चालते, यापेक्षा दुसरे वाईट काय असू शकते, अशी भावना अनेकांकडून व्यक्त होत आहे.

शिक्षणासारखे महत्त्वाचे क्षेत्र असतानाही आणि विद्यार्थ्यांच्या भविष्यासारखा महत्त्वाचा प्रश्न असतानाही अकरावी प्रवेशासाठीचे संकेतस्थळ कासवगतीने चालत असेल तर आपण खरेच प्रगतीच्या दिशेने वाटचाल करत आहोत का, याचा खरेतर विचार करण्याची गरज असल्याचे मत अनेक संतप्त विद्यार्थी आणि पालकांकडून व्यक्त होत आहे. अकरावी ऑनलाईन प्रवेशासाठीचे केवळ संकेतस्थळच संथ गतीने चालत असल्याच्या तक्रारी नाहीत. अकरावी प्रवेशासाठी लॉग-इन आयडी त्वरित न होणे. तो झाला तरी याबाबतचे पासवर्डचे संदेश विद्यार्थ्यांना न येणे. अन्य कोणी याआधीच लॉग-इन केले आहे, असा संदेश प्राप्त होणे, अर्जाचा दुसरा भाग सुरूच न होणे, अशा अनेक समस्या गेल्या काही दिवसांपासून अकरावी ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेदरम्यान अनेकांना भेडसावत आहेत.

लाखोंच्या संख्येने विद्यार्थ्यांनी अर्ज भरले आहेत. परंतु, पसंतीचे महाविद्यालय न मिळणे, आवडीच्या शाखेत प्रवेशासाठी अर्ज करण्यात तांत्रिक अडचणी येणे, इनहाऊस तसेच विविध प्रकारच्या कोट्यांमधून प्रवेशाची सोय उपलब्ध न होणे, अशा अनेक अडचणी लाखो विद्यार्थ्यांना अकरावी ऑनलाईन प्रवेशादरम्यान भेडसावत आहेत. एकाचवेळी लाखोंच्या संख्येने विद्यार्थी अर्ज करत असल्याने या अडचणी येत असल्याचे कारण अनेकांकडून पुढे करण्यात येत होते. परंतु, हे कारण पटण्यासारखे नाही.

दहावीला उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या जर लाखोंच्या संख्येने आहे, तर अकरावी ऑनलाईन प्रवेशासाठी अर्ज करणाऱ्यांची संख्यादेखील लाखोंच्या संख्येनेच असणार. त्यामुळे संकेतस्थळाची कार्यप्रणाली ही एकाचवेळी अनेकांकडून वापरता येईल, अशा क्षमतेची निर्माण करणे गरजेचे होते. यासाठी योग्य नियोजन आधीपासूनच करण्याची आवश्यकता होती. परंतु, ती न झाल्यानेच ही परिस्थिती उद्भवली. एकाचवेळी लाखोंच्या संख्येने काय कोट्यवधींच्या संख्येने वापरली जाणारी अनेक संकेतस्थळे आहेत. गुगल, फेसबुक, जीमेल, युट्यूब आदींसारखी समाजमाध्यमांची संकेतस्थळे ही अनेक लोकांकडून एकाचवेळी वापरली जातात. परंतु, तेथे अशी समस्या क्वचितच कधी जाणवते. मात्र, येथे तसे झालेले नाही.

अकरावी ऑनलाईन प्रवेशाला सुरुवात झाल्यापासून तांत्रिक अडचणी काही दूर झालेल्या नाहीत. सध्याच्या घडीला १० लाखांहून अधिक विद्यार्थ्यांचा प्रवेश झालेला असला तरी अनेकांना पसंतीच्या महाविद्यालयात आणि आवडीच्या शाखेत प्रवेश न मिळाल्याच्या तसेच इनहाऊस (संस्थांतर्गत) व विशिष्ट प्रकारच्या विविध कोट्यांमधून प्रवेश न मिळाल्याच्या तक्रारी कायम आहेत. त्यांच्या तक्रारीचे निवारण करण्याचे आव्हान प्रशासनापुढे कायम आहे.

अकरावीच्या ऑनलाईन प्रवेशासाठी गुरुवार ५ जून ही अंतिम मुदत आहे. अद्यापही काही विद्यार्थ्यांची नोंदणी प्रलंबित असून प्रशासनाने मुदतवाढ देण्याची मागणी करत आहेत. अकरावी ऑनलाईन प्रवेशासाठी मुदतवाढ मिळेल की नाही, हे कळेलच. परंतु, यावर्षी उडालेल्या गोंधळाची पुनरावृत्ती ही पुन्हा होऊ नये, हीच अपेक्षा सर्वांकडून केली जात आहे. कारण, आपल्याकडे ऑनलाईन प्रक्रियेचा इतिहास पाहता तो तितका प्रभावी ठरत नसल्याचा अनुभव सर्वांच्या गाठीशी आहे.

याआधी निकाल प्रक्रिया जेव्हा ऑनलाईन झाली तेव्हा सुरुवातीच्या काळात सर्व्हर जाम असल्याने अनेक विद्यार्थ्यांना निकालच पाहता येत नसत. सकाळी ११ वाजल्यापासून निकाल संकेतस्थळावरून पाहता येतील, असे जाहीर केले जातात. परंतु, प्रत्यक्षात ज्यावेळी निकाल पाहण्यासाठी संकेतस्थळ उघडले जायचे तेव्हा ते अपेक्षेप्रमाणे काम करत नसल्याचे जाणवायचे. तेव्हादेखील कारण हेच होते की, एकाचवेळी लाखोंच्या संख्येने विद्यार्थी, पालक संकेतस्थळ उघडत असल्याने ते योग्यरित्या काम करत नसल्याचे सांगितले जायचे. काही वेळाने मात्र ते सर्वांसाठी उपलब्ध व्हायचे. कालांतराने यात सुधारणा झाली.

आता विविध संकेतस्थळे असून विद्यार्थी, पालकांना निकाल तातडीने पाहता येतात. पूर्वीसारखी परिस्थिती काही राहिलेली नाही. केवळ निकालाच्या बाबतीतच नाही तर, मुंबई विद्यापीठाने जेव्हा ऑनलाईन मूल्यांकनाचा निर्णय घेतला होता, तेव्हादेखील अशीच गोंधळाची परिस्थिती निर्माण होऊन विद्यार्थ्यांचे निकाल लागण्यास प्रचंड उशीर झाला होता. मुंबईसारख्या प्रगत शहरात ऑनलाईन मूल्यांकन प्रक्रियेची पार दुर्दशा झाली होती. मुंबई विद्यापीठाची प्रतिमादेखील यामुळे फार मलीन झाली होती. त्यामुळे ऑनलाईन प्रक्रिया ही सुरुवातीच्या टप्प्यात काहीशी अडचणीची ठरत असल्याचा अनुभव हा आत्ताचा नसून पूर्वीपासूनचा आहे. फक्त यापुढे त्याची पुनरावृत्ती होऊ नये, यासाठीचे नियोजन करण्याची गरज

## हीच ती ७२ गावे

महाड तालुक्यात संभाव्य दरडग्रस्त गावांच्या यादीत लोअर तुडील, नामावले कोंड, शिंगरकोंड मोरेवाडी, आंबिवली पातेरीवाडी, कोंडीवते मूळ गावठाण, सव, सोनघर, जुई बुद्रुक, चांढवे खुर्द, रोहन, वलंग, कोथेरी जंगमवाडी, माझेरी, पारमाची वाडी, कुंबळे, कोसबी, वामने, चिंभावे बौद्धवाडी, वराठी बौद्धवाडी, चोचिंदे, चोचिंदे कोंड, गोठे बुद्रुक, आदिस्ते, खैरे तर्फे तुडील, कुर्ला दंड वाडी, रावतळी मानेचीधार, मोहोत सुतारवाडी, मांडले, पिंपळकोंड, मुमुर्शी आंब्याचा कोंड, मुमुर्शी गावठाण, मुमुर्शी बौद्धवाडी, वीर गाव, वीर मराठवाडी, टोळ बुद्रुक, दासगाव भोईवाडा, तळोशी, बिरवाडी वेरखोले, करंजखोल, नडगाव काळभैरव नगर, पुनाडेवाडी, पाचाडवाडी, सांदोशी हेटकर कोंड, शेलटोळी, अंबेशिवथर, वाळण बुद्रुक, नाणे माची, कोंडीवते नवीन, हिरकणी वाडी, पाचाड परडी वाडी, वाघेरी आदिवासी वाडी, कोथेरी तांदळेकर वाडी, करंजाडी म्हस्के कोंड, नातोंडी धारेची वाडी, गोंडाळे, खर्डी, पांगारी मनवेधार, वरंध पोकळे वाडी, वरंध बौद्धवाडी, आड्राई, वाळण झोळीचा कोंड,वाळण केतकीचा कोंड, भीवघर, पिंपळवाडी, रुपवली, निगडे, बारसगाव, कोथेरी, ओवळे, खरवली, तळीये असून या ७२ गावातील हजारो नागरिकांना निवारा शेडमध्ये तात्पुरत्या स्वरुपात स्थलांतरित करावे लागणार आहे.

# महाडमधील ७२ गावे दरडग्रस्तांच्या यादीत
# आपत्कालीन यंत्रणा आहे कुठे



**■महाड :** भूस्खलन, जमिनींना भेगा पडणे, दरड कोसळणे अशा दुर्घटना महाड तालुक्यात काही वर्षांपासून घडत आहेत. यंदाही तालुक्यातील ७२ गावांचा समावेश दरडग्रस्त यादीमध्ये करण्यात आला आहे. विशेष म्हणजे संभाव्य दरडग्रस्त गावांमध्ये दरवर्षी कागदोपत्री नियोजन केले जाते. प्रत्यक्षात दरडग्रस्त गावांमध्ये अद्याप उपायोजना केलेल्या नाहीत. त्यामुळे सरकार खरेच गंभीर आहे का, असा सवाल उपस्थित केला जात आहे.

महाड तालुक्याचा ८० टक्के भाग दऱ्याखोऱ्यात वसलेला आहे. १९९५ पासून तालुक्यात सातत्याने दरड दुर्घटना होत आहेत. २००५ मध्ये महाड तालुक्यात मोठ्या प्रमाणात दरडी कोसळून शेकडो लोकांना जीव गमवावा लागला होता. त्यानंतर तळीये गावात देखील अशाच प्रकारे दरड कोसळली आणि जीवितहानी झाली होती. यामुळे महाडसह पोलादपूर तालुक्यातील अनेक गावे संभाव्य दरडग्रस्त गावांच्या यादीत आली आहेत. महाडमध्ये दरडप्रवण क्षेत्रामधून भूस्खलन होण्याच्या शक्यतेने रहिवाशांना स्थलांतरित करावे लागणार आहे. मात्र, अद्याप या गावांमधून तात्पुरत्या निवासस्थानांची उभारणी झालेली नाही. शासनाकडे संभाव्य दरडग्रस्त भागात भूस्खलन होईल किंवा तो भाग पावसाच्या पाण्यामुळे खचेल, अशी पूर्व संदेश देणारी किंवा संकेत देणारी यंत्रणा विकसित नाही.

यंदा १० मे पासून बेमोसमी पाऊस कोसळू लागला होता. तसेच २६ मेपासून रायगडमध्ये मान्सूनचे जोरदार आगमन झाले. त्यातच जिल्हा प्रशासन किल्ले रायगडावर शिवराज्याभिषेक दिन सोहळ्याच्या तयारीत गुंतले आहे. यामुळे मान्सूनपूर्व कामे आणि संभाव्य दरडग्रस्त गावांमध्ये अद्याप कोणत्याच उपाययोजना झालेल्या नाहीत. या गावातील ग्रामस्थांना सुरक्षित स्थळी स्थलांतरित होण्याबाबत नोटिसा बजावण्यात आलेल्या आहेत. शासकीय पातळीवर नागरिकांना स्थलांतर करणे, स्थलांतर करण्यासाठी निवारा व्यवस्था, महाड शहरात पूर परिस्थितीसाठी लागणारी बचाव यंत्रणा, संपर्क साधनांची उपाययोजना, बोटींची व्यवस्था, पूरपरिस्थितीत दूरध्वनी यंत्रणा अशा सुविधा अद्याप कागदावरच आहेत.

महाड तालुक्यातील महसूल यंत्रणा व आपत्ती निवारण यंत्रणा पावसाळा तोंडावर आला असतानाही सुस्त आहेत. धोकादायक परिस्थिती उद्भवल्यास शाळा, समाजमंदिर, मंदिर, अंगणवाडी अशाठिकाणी या नागरिकांची ठेवण्याची व्यवस्था करण्यात येईल, असे महाडचे निवासी तहसीलदार महेश शितोळे यांनी सांगितले. आपत्कालीन परिस्थिती उद्भवल्यास किंवा संपूर्ण पावसाळ्यामध्ये तलाठी मंडळ अधिकारी आणि इतर महसूल कर्मचाऱ्यांनी यांना दिलेल्या ठिकाणीच वास्तव्य करायचे आहे. मात्र, तक्रार आल्यास कारवाई केली जाईल, असेही तहसीलदार महेश शितोळे यांनी सांगितले.

# महागाईमुळे बकरी बाजारावर मंदीचे सावट...



### पांढऱ्या शुभ्र बकऱ्याला अधिक मागणी

बकरी ईद सणाला पांढऱ्या शुभ्र बकऱ्याला अधिक मागणी असल्याने हे बकरे २५ हजारापासून ते ९० हजारपर्यंत विकले जातात. मात्र बाजारात बकऱ्यांच्या किमती अधिक असूनही मुस्लिम बांधव मोठ्या प्रमाणात खरेदी करत असल्याचे दिसून येत आहे. विशेष म्हणजे पर राज्यातील व्यापारी कोनगाव बकरी बाजारात बकऱ्यांना उघड्यावरच बांधून ठेवत असल्याने पावसामुळे ते आजारी पडत असल्याची खंत व्यापाऱ्यांनी व्यक्त केली आहे.

**■भिवंडी :** बकरी ईदनिमित्त कुबार्नीसाठी खास बकरा हवा असतो, बकरी ईद म्हणजे ईद-उल-अधा हा त्यागाचा सण म्हणून मुस्लिम धर्मीय बांधव मोठ्या उत्सवात साजरा करत असतात. यंदा ७ जून रोजी बकरी ईद साजरी केली जाणार आहे. त्यामुळे बकरे खरेदी करण्यासाठी बकरी बाजारात मोठ्या प्रमाणात गर्दी झाल्याचे चित्र पहावयास मिळत आहे. मात्र यंदा महागाई आणि पावसामुळे भिवंडीतील बकरी बाजारात बकरे खरेदी करण्याचे प्रमाण कमी होत असल्याचे चित्र पहावयास मिळत आहे.

ठाणे जिल्ह्यातील सर्वात मोठा बकरी बाजार भिवंडी तालुक्यातील कोनगाव, तरीपाडा या भागात भरत असतो. गेल्या अनेक वर्षांपासून या ठिकाणी आठवड्यातून तीन दिवस बारामाही बकरी बाजार भरतो. त्यातच दरवर्षी बकरी ईद निमित्ताने हा बाजार महिन्याआधीपासून सुरू होतो. हा बकरी बाजार संपूर्ण जिल्ह्यात प्रसिद्ध असून मंगळवार, गुरुवार व शनिवार या तीन दिवसात भरणाऱ्या या बकरी बाजारात यंदा बकरी गुजरात, राजस्थान, उत्तर प्रदेश आणि मध्य प्रदेश या राज्यातून मोठ्या संख्येने व्यापारी आले आहेत. मात्र गेल्या २० दिवसांपासून महागाईमुळे बाजारात मंदीचे सावट असल्याने खूपच कमी प्रमाणात बकरे विक्री झाल्याची खंत एका बकरा व्यापाऱ्याने व्यक्त केली.

आठवड्यातील मंगळवार, गुरुवार व शनिवार या तीन दिवसात भरणाऱ्या या बकरी बाजारात गुजरात, राजस्थान, उत्तर प्रदेश आणि मध्य प्रदेश या राज्यातून मोठ्या संख्येने व्यापारी येत असतात. तर दुसऱ्या दिवशीच्या मटण विक्रीसाठी अनेक मटण विक्रेते, खाटीक या ठिकाणी बकरे खरेदीसाठी येत असतात.

ग्रामीण भागात मार्च ते मे महिन्यात मोठ्या प्रमाणावर लग्नसराई होत असल्यामुळे हळदी सभारंभात मटणाचा बेत सगळीकडे आखला जातो. त्यामुळे या दिवसातही बकऱ्यांच्या किमती १० ते ३० हजारापर्यंत पोहचत असल्याचे मत व्यापाऱ्यांनी मांडले. मात्र यंदाच्या बकरी ईद सणावर पावसाचे सावट असल्याने व्यापाऱ्यांमध्ये चिंतेचे वातावरण पसरले आहे. विशेष म्हणजे पर राज्यातील व्यापारी ट्रक - टेम्पोने हजारो किलोमीटरचा प्रवास करून या बकरी बाजारात दाखल होत असतात. त्यामुळे चांगल्या कमाईची आशा असणाऱ्या व्यापाऱ्यांना मात्र परतीच्या प्रवासाचे भाडे जमवणे देखील अडचणीचे ठरत असल्याची खंत व्यापाऱ्यांनी व्यक्त केली आहे.

"जोधपूर, राजस्थान येथून बकरे विक्रीसाठी बाजारात आले आहेत. परंतु पावसामुळे खरेदीदारांची संख्या कमी झाली आहे. बकरे उघड्यावर बांधल्याने त्याचा फटका व्यापाऱ्यांना बसत आहे. तसेच पावसामुळे अनेक बकऱ्यांची तब्येत खालावली असल्याने बोकड विक्री करताना भावही कमी मिळत आहे. त्यामुळे यावेळी आर्थिक नुकसानीला सामोरे जावे लागणार आहे."

**- सद्दाम शेख, बकरे विक्रेता, (व्यापारी)**

# वसईतील कपड्याच्या गोदामाला भीषण आग

**■विरार :** मुंबई-अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावरील वसई फाटा परिसरातील आर्टिमाइज इलेक्ट्रिकल या कंपनीच्या इमारतीला बुधवारी रात्री ९ वाजताच्या सुमारास भीषण आग लागली. आगीचे प्रमाण इतके मोठे होते की जळर्णाया कापडामुळे धुराचे लोळ दूरवरूनही स्पष्ट दिसत होते. सुरुवातीला आग कंपनीच्या चौथ्या मजल्यावर लागली. मात्र काही वेळातच ती तिर्सया मजल्यावर पसरली. आग लागल्यानंतर संपूर्ण इमारतीत एकच गोंधळ उडाला. गोदामात मोठ्या प्रमाणात कपड्यांचा साठा असल्यामुळे आगीने काही वेळातच रौद्र रूप धारण केले. आगीवर नियंत्रण मिळवण्यासाठी वसई-विरार महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागाच्या अनेक गाड्या घटनास्थळी दाखल झाल्या. जवानांनी युद्धपातळीवर आग विझवण्याचे काम सुरू केले आहे. शतीऽचे प्रयत्न सुरू असले तरी आगीचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. मात्र, प्राथमिक अंदाजानुसार ही आग शॉर्ट सर्किटमुळे लागली असावी, अशी माहिती अग्निशमन विभागाचे मुख्य अधिकारी यांनी दिली आहे. या आगीमुळे कंपनीचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. अद्याप कोणतीही जीवितहानी झाली नसली, तरी एक दुदैर्वी घटना घडली.



# बॅटरी पॅक उघडलाच नाही म्हणून ती आग भडकली

**■नवी मुंबई :** नवी मुंबई महापालिकेच्या घणसोली आगारात बुधवारी (ता.४) इलेक्ट्रिक आणि डिझेल अशा चार बसेसला सकाळी सातच्या सुमारास अचानक आग लागल्याची घटना घडली. वाशी, कोपरखैरणे आणि ऐरोली अग्शिशमक दलाच्या पथकाने धाव घेत आगीवर नियंत्रण मिळविले. सकाळच्या सुमारास कर्मचाऱ्यांची वर्दळ कमी असल्याने कोणतीही जीवितहानी झाली नाही. इलेक्ट्रिक बस चार्जिंग करताना शॉर्ट सर्कीट झाल्याने ही आग लागल्याची प्राथमिक माहिती परिवहनच्या अधिर्कायांनी दिली. घणसोली आगारातील सुरक्षाव्यवस्था, शॉर्टसर्किटविरोधी उपाययोजना, चार्जिंग स्टेशन आणि इलेक्ट्रिक वाहनांच्या सुरक्षेचा प्रश्न समोर आला आहे.

घणसोली आगारात इलेक्ट्रिक बस क्रमांक एमएच-४३ बीपी-४५४२ ला आग लागली. इलेक्ट्रिक बसमध्ये शॉर्ट सर्कीट झाल्याने बॅटरीने पेट घेतला. चार बॅटरी पॅक सील असल्याने बाहेर काढता न आल्याने पेट घेतलेल्या बसचा अधिक भडका उडाला. या बसने नजीक उभ्या असर्णाया डिझेलच्या इतर तीन बसेसला वेढा घातला. त्या बसेस देखील आगीत पुर्णपणे जळाल्या आहेत. त्या सोबतच पार्क केलेल्या सात बसेसला आगीची झळ पोहचल्याने त्याचे देखील नुकसान झाले आहे.

एनएमएमटीच्या अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार कार्यशाळेमध्ये दुरूस्तीकरिता उभ्या असलेल्या (पुरवठादार मे.एम.एच. इको लाईफ) एका इलेक्ट्रिक बसने शॉर्ट सर्कीटमुळे पेट घेतला. मे.महालक्ष्मी बस ट्रान्सपोर्ट प्रा.लि.कंपनीकडील (कंत्राटदार) दुरुस्तीसाठी आगारात आलेल्या तीन डिझेल बसेस आगीच्या भक्ष्यस्थानी पडल्या. या घटनेची नोंद रबाळे पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

**एक ते सव्वा कोटींचे नुकसान**

घणसोली-पामबीच रस्त्यावर मॉर्निंग वॉकसाठी जार्णाया नागरिकांनी या आगीचे व्हिडीओ तयार केले. तर काहींनी याची माहिती अग्निशमक दलाला दिली. आगीचे लोट पाहून बघ्यांची गर्दी जमली होती. आगीत एनएमएमटीचे सुमारे एक ते सव्वा कोटींचे नुकसान झाल्याचा अंदाज आहे.

# जल जीवन मिशन योजनेच्या प्रगतीची केंद्रीय सचिवांनी केली पाहणी




मीना यांनी यावेळी वाकडपाडा आणि किनिस्ते या गावांतील जल जीवन मिशन योजनेच्या कामाची पाहणी केली. वाकडपाडा येथील कातकरी वाडीला भेट देऊन त्यांनी नळ जोडणी मिळालेल्या कुटुंबांशी संवाद साधला. यावेळी त्यांनी स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) अंतर्गत शौचालयाची उपलब्धता, कचरा वर्गीकरण आणि गावातील स्वच्छतेची स्थिती याबाबत विचारणा केली. किनिस्ते गावात पाण्याच्या गुणवत्तेची तपासणी करर्णाया पाच महिला जल सुरक्षकांनी पाण्याच्या नमुन्यांचे प्रात्यक्षिक दाखवले, ज्यामुळे योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीचा प्रत्यय सचिवांना आला.

**■पालघर :** भारत सरकारच्या जलशक्ती मंत्रालयाचे सचिव अशोक कुमार के. मिना यांनी पालघर जिल्ह्यातील मोखाडा तालुक्यातील ५८ गावांना पाणीपुरवठा करर्णाया जल जीवन मिशन योजनेच्या जलस्त्रोत आणि पाणी शुद्धीकरण केंद्राची प्रत्यक्ष पाहणी केली. या भेटीदरम्यान त्यांनी योजनेच्या प्रगतीचा आढावा घेतला आणि स्थानिक स्तरावरील अंमलबजावणीचे मूल्यमापन केले.

यावेळी राज्य पाणी व स्वच्छता विभागाचे अभियान संचालक ई. रविंद्रन, पालघरच्या जिल्हाधिकारी डॉ. इंदुराणी जाखड, मुख्य कार्यकारी अधिकारी मनोज रानडे, जव्हारच्या प्रकल्प अधिकारी अपूर्वा बसुर, जिल्हा पाणी व स्वच्छता विभागाचे प्रकल्प संचालक अतुल पारसकर, ग्रामीण पाणी पुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता राजेश पाध्ये, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे कार्यकारी अभियंता अजय मुळे, मोखाडा गटविकास अधिकारी अक्षय पगार, मोखाडा पंचायत समितीचे माजी सभापती प्रदिप वाघ, तसेच राज्य आणि जिल्हा स्तरावरील विविध अधिकारी, कर्मचारी आणि सल्लागार उपस्थित होते.

याशिवाय ग्रामपंचायत सरपंच, सदस्य, गावकरी, महिला बचत गटाच्या सदस्या, आशा वर्कर आणि अंगणवाडी सेविका यांनीही सहभाग नोंदवला.

# विक्रोळी उड्डाणपुलाचे काम पूर्ण



येत्या दोन दिवसात एका बाजूकडील ध्वनिरोधक, रंगकाम आणि पश्चिमेकडील बाजूवर मार्ग रेषा आखणी आदी कामे पूर्ण करण्यात येणार आहे. तसेच सध्या वाहतूक बेट उभारण्यात येत आहे. वाहतूक दिवे अर्थात सिग्नल बसवायचे काम सुरु आहे. वाहतूक पोलिसांसमवेत समन्वय साधून लवकरच विक्रोळी पूल वाहतुकीस खुला करण्यात येईल, असे महानगरपालिका प्रशासनाने कळविले आहे.

**■मुंबई :** रेल्वे फाटक ओलांडताना होणारे अपघात टाळण्यासाठी सुमारे पाच वषार्पूर्वी मुंबई महापालिका आणि रेल्वेच्यावतीने फाटक बंद करून विक्रोळी उड्डाणपुलाची उभारणी सुरू केली होती. तब्बल पाच वषार्नंतर या उड्डाणपुलाचे बांधकाम पूर्ण झाले आहे. त्यामुळे येत्या काही दिवसात वाहतूक पोलिसांशी समन्वय साधून लवकरच विक्रोळी पूल वाहतुकीसाठी खुला करण्यात येईल, अशी माहिती महानगरपालिका प्रशासनातर्फे देण्यात आली.

या उड्डाणपुलामुळे पूर्व उपनगरातील विक्रोळी येथील रेल्वे मार्गावरून जाणारी पूर्व - पश्चिम बाजू जोडली जाणार आहे. या पुलामुळे विक्रोळी पश्चिमेकडील लाल बहादूर शास्त्री मार्ग आणि पूर्व परिसरातील पूर्व द्रुतगती महामार्ग जोडले जाणार आहेत. प्रवास वेळेत सुमारे ३० मिनिटांची बचत होणार आहे.

विक्रोळी रेल्वे मार्गावर उभारण्यात आलेल्या पुलाची एकूण रुंदी १२ मीटर तर लांबी ६१५ मीटर इतकी आहे. त्यापैकी ५६५ मीटरची उभारणी मुंबई महानगरपालिकेने केली आहे. तसेच उर्वरित ५० मीटर लांबीपर्यंतची उभारणी मध्य रेल्वेकडून करण्यात आली आहे. रेल्वे विभागाकडून एकूण ७ तुळ्या स्थापित करण्यात आल्या असून त्यांचे एकूण वजन ६५५ टन आहे. या पुलावर महानगरपालिकेने टाकलेल्या तुळ्या सुमारे २१४२ टन इतक्या वजनाच्या आहेत. तसेच या तुळ्यांची लांबी २५ ते ३० मीटर इतकी आहे. पुलाच्या तीन टप्प्यांत एकूण १८ तुळ्या टाकण्यात आल्या आहेत. या पुलाच्या एकूण १९ स्तंभांपैकी पूर्वकडील बाजूस १२ तर पश्चिमेकडील बाजूस ७ स्तंभ उभारले आहेत. पुलाच्या दोन्ही बाजूचे पोहोच रस्ते मार्गिकांवरील कॉंक्रिट, मास्टिक, ध्वनी रोधक, अपघातरोधक अडथळा आदी सर्व पूर्ण करण्यात आली आहेत.

## तालुक्यातील बेकायदा गौण खनिज उत्खननाला कुणाचा आशीर्वाद
# सामाजिक कार्यकर्त्यांचा हायकोर्टात जाण्याचा इशारा



संतोष ठाकूर यांनी सांगितले की, २०२३ पासून जिल्हाधिकारी कार्यालय, पेण तहसील आणि उपविभागीय अधिकारी कार्यालयाकडे वारंवार अर्ज, निवेदने, मोर्चे, आंदोलने करून बेकायदेशीर उत्खननामुळे खैरासवाडी, वडमालवाडी येथील आदिवासींच्या जीवनास धोका निर्माण होत असल्याचे निदर्शनास आणून दिले होते. तरीही रायगड जिल्हा प्रशासनासह आदिवासींच्या कल्याणासाठी असलेले एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, तालुका महसूल विभाग आदिवासींच्या आक्रोशाकडे दुर्लक्ष करत जीवाशी खेळत आहे. ओव्हरलोडेड दगड वाहतूक वनविभागाच्या जागेतून होत असताना पेणचे वन परिक्षेत्राधिकारी प्रदीप पाटकरांचा छुपा पाठिंबा असल्याचा आरोप ठाकूर यांनी केला.

**■अलिबाग :** पेण तालुक्यातील ग्रुप ग्रामपंचायत दशमी खारपाडा, खरोशी, बेलवडे, बळवली आणि बोरगाव हद्दीत सुमारे १३ बेकायदेशीर दगड खाणींसह स्टोन क्रशर्स आहेत. यांच्या माध्यमातून बेसुमार उत्खन सुरू असून त्यामुळे पर्यावरणाचा ऱ्हास, आदिवासी जनजीवनावरील परिणाम आणि राज्य सरकारचे आर्थिक नुकसान होत आहे. या संदर्भात सामाजिक कार्यकर्ते संतोष ठाकूर, एकविरा प्रतिष्ठान तथा वन शक्ती सामाजिक संस्थेचे कार्यकर्ते नंदकुमार पवार, उच्च न्यायालयाचे अधिवक्ता तथा लोक हितकारिणी सभेचे अध्यक्ष ॲड. सिद्धार्थ इंगळे यांनी उच्च न्यायालयात जाण्याचा इशारा दिला आहे. या संदर्भात माहिती देण्यासाठी त्यांनी बुधवारी (४ जून) अलिबागमधील शासकीय विश्रामगृहात पत्रकार परिषद आयोजित केली होती.

पेण तालुक्यात बेकायदा दगड खाणी आणि स्टोन क्रशर्स असून यांना वन विभाग आणि परिवहन विभागाचे अभय असल्याचा गंभीर आरोप नंदकुमार पवार यांनी केला. जिल्हा प्रशासनाकडून माहितीचा अधिकार आणि राज्य शासनाच्या खनिकर्म विभागाच्या परवेश पोर्टलवर खरोशी हद्दीत वैभव एकनाथ दुधे यांचा फक्त एक अर्ज उत्खननासाठीच्या परवानगीसाठी आल्याचे दिसते. प्रत्यक्षात आदिवासी वस्तीला लागूनच आणि पर्यावरणासंबंधीचे सर्व नियम आणि अटी धाब्यावर बसवून पेण तहसीलदारांनी दिलेल्या तातुरत्या ५०० ब्रास उत्खननाच्या परवान्याचा गैरवापर केला जात आहे. वनविभागाच्या जागेतून, पेण आरटीओच्या कार्यालयासमोरून दररोज शेकडो ओव्हरलोडेड डंपरने वाहतूक होत असताना वनविभाग, परिवहन विभाग आणि महसूल विभाग जाणीवपूर्वक दुर्लक्ष करून राज्य सरकारचा महसूल आणि पर्यावरणाचा ऱ्हास करत असल्याकडे लक्ष वेधले.

वन अधिकाऱ्यांसह या दगड खाणींना अभय देणाऱ्या महसूल विभाग आणि परिवहन विभाग अधिकाऱ्यांच्या आर्थिक हितसंबंध असण्याची शक्यता नाकारता येत नाही. म्हणूनच या दगड खाणींचे मालक सरकारचा कोट्यवधी रुपयांचा महसूल बुडवण्याची हिंमत करत असल्याचा आरोप संतोष ठाकूर यांनी केला. त्यामुळे जिल्हाधिकारयांनी या प्रकरणात तात्काळ हस्तक्षेप करून बेकायदा दगड खाणींवर कारवाई करून त्यांच्या उत्खननाचे ईटीएस (इलेक्ट्रिकल टोटल स्टेशन) टेक्नॉलॉजीमार्फत सर्वेक्षण करून त्याचा अहवाल राज्य सरकारला सादर करावा आणि दोषींवर दंडात्मक कारवाई करावी अन्यथा रायगड जिल्हाधिकारी आणि संबंधित विभागांविरोधात उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल करणार असल्याचे ॲड. सिद्धार्थ इंगळे यांनी सांगितले.

# टवाळखोरांवर पोलिसांची कारवाई

**■कल्याण :** पाऊस सुरू झाल्यामुळे पावसाचा आनंद लुटण्यासाठी कल्याण पूर्वेतील मोकळ्या मैदानात, झाडाझुडपांचा आधार घेऊन सार्वजनिक ठिकाणी दारू सेवन करर्णाया, दारू पिऊन गोंधळ घालर्णाया, शांततेच्या भंग करर्णाया ४४ टवाळखोर तरूणांवर कोळसेवाडी पोलिसांनी रविवारी रात्री कारवाई केली. या टवाळखोर तरूणांवर महाराष्ट्र पोलीस कायदा, दारूबंदी कायद्याने कोळसेवाडी पोलिसांनी कारवाई केली आहे. पाऊस सुरू झाल्यामुळे कल्याण पूर्वेतील अनेक तरूण दारूच्या बाटल्या घेऊन सार्वजनिक ठिकाणची मैदाने, उद्याने, बगिचे, झाडझुडपांचा आधार घेऊन मद्यपान करत असल्याचे पोलिसांच्या निदर्शनास आले होते.

सार्वजनिक ठिकाणी दारू पिऊन कोणीही गोंधळ घालत असेल, शांततेचा भंग आणि कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण करत असेल तर त्यांच्यावर कठोर कारवाई करण्याचे पोलीस उपायुक्त अतुल झेंडे यांचे आदेश आहेत. कोळसेवाडी पोलीस ठाण्याचे सीनियर पोलीस इन्स्पेक्टर गणेश न्हायदे यांच्या मार्गदर्शनाखाली चार ते पाच पोलीस पथकांनी कल्याण पूर्वेतील कोळसेवाडी, काटेमानिवली, विजयनगर, चिंचपाडा परिसरात रविवारी रात्री शोध मोहीम हाती घेऊन सार्वजनिक ठिकाणी दारू पिण्यास बसलेल्या, दारू पिऊन रस्त्यावर धिंगाणा करर्णाया, झाडाझुडपांचा आधार घेऊन काळोखामध्ये दारू पित बसलेल्या तरूणांच्या टोळक्यांना पोलिसांना ताब्यात घेतले. पोलिसांना पाहताच या तरुणांनी सुरूवातीला पळून जाण्याचा प्रयत्न केला. पण पोलिसांनी त्यांना रोखून धरले. पकडलेल्या तरुणांना पोलीस पिंजरा वाहनातून कोळसेवाडी पोलीस ठाण्यात आणण्यात आले. यामधील बहुतांशी तरुणांनी दारू प्यायली होती. असे पोलिसांच्या निदर्शनास आहे. या सर्व टवाळखोर तरुणांना कोळसेवाडी पोलीस ठाण्यात आणून पोलिसांनी त्यांच्यावर महाराष्ट्र पोलीस कायदा, दारूबंदी कायद्याने गुन्हे दाखल केले.

पुन्हा अशाप्रकारे सार्वजनिक ठिकाणी मद्यपान करणार नाही, अशी हमी लिहून घेतली आहे. या कारवाईने परिसरातील नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे. या मद्यपी तरुणांचा पादर्चायांना विशेषता महिला वगार्ला सर्वाधिक उपद्रव होत होता. मागील पाच महिन्यापूर्वी कल्याण परिमंडळ ३ चे डीसीपी अतुल झेंडे यांच्या मार्गदर्शनाखाली कल्याण पूर्व भागातून दररोज १५ ते २० मद्यपींना पकडून आणून पोलीस ठाण्यात प्रसाद दिला जात होता. तेव्हापासून कल्याण पूर्वेतील सार्वजनिक ठिकाणचे दारू अड्डे बंद झाले होते. ते पाऊस सुरू झाल्यानंतर पुन्हा सुरू झाल्याचे निदर्शनास आल्याने कोळसेवाडी पोलिसांनी या टवाळखोरांवर कारवाई केली आहे.

# कंटेनरच्या धडकेत पादचाऱ्याचा मृत्यू

**■भिवंडी :** ठाणे-नाशिक मार्गावर भिवंडीकडे भरधाव वेगाने जाणाऱ्या कंटेनरने पादचाऱ्याला जोरात धडक दिल्याने पादचाऱ्याचा ट्रकखाली चिरडून मृत्यू झाल्याची घटना मंगळवारी घडली. उमाशंकर महेश शर्मा (३२) असे अपघातात मयत झालेल्याचे नाव आहे. याप्रकरणी ट्रकचालका विरोधात कोनगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार,३ जून रोजी रात्री साडेअकराच्या सुमारास उमाशंकर हा भिवंडी बायपास जवळील रिक्षास्थानकावर उभा असताना भरधाव वेगात आलेल्या कंटेनरने उमाशंकर यास जोरात धडक दिली. या धडकेत उमाशंकर खाली पडून कंटेनरच्या चाकाखाली आल्याने त्याचा जागीच मृत्यू झाला. दरम्यान पोलिसांनी घटनास्थळी दाखल होत मृतदेह शवविच्छेदनासाठी येथील शासकीय स्व.इंदिरा गांधी रुग्णालयात पाठवला आहे. अपघातानंतर कंटेनरचालक घटनास्थळावरून ट्रक फरार झाला असून त्याच्या विरोधात लवकुश सिताराम शर्मा (३८) याच्या फियार्दीवरून कोनगाव पोलिसांत गुन्हा दाखल केला असून पोलीस चालकाचा शोध घेत आहेत. पुढील तपास सपोनि वैभव मुबळे करीत आहेत.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय - गाला नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र) , येथे छापून रुम नं. १०३, कुणाल कुटीर बी बिल्डींग, नवघर रोड, हनुमान मदिराजवळ, भाईंदर (पुर्व), जि. ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या /लेख / जाहिराती यांची जवाबदारी संबंधीत वार्ताहर, लेखक, आणि जाहिरात प्रतिनिधी याच्यावर राहील.) भ्रमणध्वनी - ७४०००0१४७४. Email : marathiekikaran2021 @gmail.com

Printed , Published and Owned by **Dr. Mr. Deepak Moreshwar Naik**. Printed at **SOMANI PRINTING PRESS**, OFFICE - Gala No. 4, Near N.K. Industrial Estate, Near Pravasi IndustrialEstate, Gate No.2, Goregaon (E), Mumbai 400 063, Maharashtra, Published at Room No. 103, Kunal Kutir, B Building , Navghar Road, Near Hanuman Mandir, Bhayander (East ) Dist - Thane, PinCode 401 105, Maharashtra. Editor : Dr. Mr. Deepak Moreshwar Naik, Mo.7400001474, Email Id : marathiekikaran2021@gmail.com